Exh. 11/D

रे. क. नं. 43/2026.

**मे. दिवाणी न्यायाधिशसो क. स्तर वडगांव**
**यांचे कोर्टात ...**




आप्पासो दत्तात्रय खोत, ——— वादी
वगैरे 3.

वि रू ध्द

आनंदा विठोबा यंगारे, ——— प्रतिवादी

सी. प्रो. कोड क. 151 प्रमाणे states quo
~~स्थगिती~~ अर्ज.

यातील वादी मे. कोर्टाना नम्रपणे कळवितात की

Order
o.s. to say

Sd/-
Jt. CJJD

1. प्रस्तुतचा दावा वादीनी कायम मनाई करीता दाखल केलेला आहे. सदर कामी मे. कोर्टानी निा 5 वर प्रतिवादीना नोटीसचा आदेश केलेला आहे. मुदतीत प्रतिवादीना नोटीसा लागू झालेल्या आहेत व मागील तारीख 25/2/26 रोजी यातील प्रतिवादी तर्फे म्हणणे व कैफियत देणेसाठी मुदत मागितलेली आहे.

2. आजरोजी यातील प्रतिवादी यांनी या कामी निा 5 ला म्हणणे व कैफियत दाखल केलेली नाही.

7/3/26
Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

3. सदर दावेमध्ये निा 5 चे अर्जामध्ये नमुद केलेप्रमाणे प्रतिवादी हे दावा मिळकतीची मोजणी केलेप्रमाणे वादीचे पूर्वापारवहिवाटीचे जमिनी मध्ये दांडगाव्याने कब्जा घेणार आहेत. त्यामुळे वादीस आपले 12 गुंठे जमिनीस मुकावे लागणार आहे.

4. सदर कामी दावा मिळकतीचा रि. स. नं. 380 चे एकत्रीकरणावेळी चुकीची मोजणी झालेली आहे. त्या बाबत मा. संचालक,भूमि अभिलेख, पुणे प्रदेश पुणे यांचेकडे अर्ज दाखल करून रि. स. नं. 380 ची पुन्हा मोजणी करणे बाबत अर्ज दाखल केलेला आहे.

5. सदर दावा मिळकतीमध्ये जर प्रतिवादीनी दांडगाव्याने कब्जा केला व मा. संचालक, भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांचे निर्णयाप्रमाणे जर प्रतिवादीनचे क्षेत्रामध्ये वादींचे अतिक्रमण नाही असे शाबीत झालेस वादीस पुन्हा प्रतिवादी कडून कब्जा मागणेचा दावा करावा लागेल, त्यामुळे या कामी मे. कोर्टानी Status-quo चा आदेश केला नाही तर Multiplicity of proceeding वादीस करावी लागतील. त्यामुळे दावेतीली पक्षकारांना आपला वेळ, पैसो व मानसीक त्रासाला सामोरे जावे लागेल.

6. वरील सर्व परिस्थिती व कारणांचा विचार करून या कामी प्रतिवादी यांनी दांडगाव्याने दावा मिळकती 1 (ब) व (क) या मिळकतीमधील मोजणी प्रमाणे हिस्सेचा कब्जा घेवू नये म्हणून वादीस प्रस्तुतचा Status-quo मिळणेकरीता अर्ज दाखल करणे भाग पडत आहे.

7. <u>सबब वादींची विनंती की,</u> –

अ. प्रस्तुतचे कामी निा 5 चे चौकशीचे आदेशा पर्यंत दावा मिळकतीमध्ये Status-quo चा आदेश करणेत यावा.

7/3/24
Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

ब. जरूर तर इतर आदेश वादींचे वतीने व्हावेत.

येणेप्रमाणे असे.

वडगांव :
ता. 7/3/2026

आप्पासो दत्तात्रय खोत

## प्र ति ज्ञा

मी वादी आप्पासो दत्तात्रय खोत, व.व. 65, धंदा – शेती, रा. कुंभोज, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञा करतो की, वरील अर्जातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली सत्य प्रतिज्ञा असे.

वडगांव :
ता. 7/3/2026

आप्पासो दत्तात्रय खोत

## ॲ फि डे व्ही ट

मी वादी आप्पासो दत्तात्रय खोत, व.व. 65, धंदा – शेती, रा. कुंभोज, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर शपथपूर्वक ॲफिडेव्हीट करतो की, वरील अर्ज़ातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट आजरोजी वडगांव मुक्कामी असे.

वडगांव :
ता. 7/3/2026
मी ॲफिडेव्हीट करणार यास ओळखतो

आप्पासो दत्तात्रय खोत

ॲड. एस. जी. कुंभार

7/3/26
Assistant Superintendant
Civil Court, Peth Vadgaon

## प्र ति ज्ञा

मी वादी आप्पासो दत्तात्रय खोत, व.व. 65, धंदा – शेती, रा. कुंभोज, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञा करतो की, वरील अर्जातील व ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली सत्य प्रतिज्ञा असे.

वडगांव :
ता. 7 / 3 / 2026

आप्पासो दत्तात्रय खोत

Solemnly Affirmed before me by
Shri Appaso Dattatraya Khot
Age 65 of Kumbhoj Tal who is Hatkanangale
identified by Shri S. G. Kumbhar Adv.
.............whom I know personally
Dated :- 7/3/26

Assistant Superintendent